CMYK




दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com



आमदार तानाजी सावंत यांची तीन तालुक्यांना सात महिन्यांपासून प्रतीक्षा
पेज ४

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 149 ■ गुरुवार, दि. 10 जुलै 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रु 5

# कचराबाद..





## या व्यवस्थेला जबाबदार कोण, सत्ताधारी, विरोधक की नागरिक..?

### ना रस्ते, गटारी ना मुतारी... शहर स्वच्छतेचे तीन तेरा

आरंभ मराठी | धाराशिव

मागील ७-८ वर्षांच्या पालिकेच्या कार्यकाळात प्रमुख राजकीय पक्षांनी धाराशिव नगर पालिकेत सत्तेचे बोट चाखले आणि शहराची बकाल अवस्था झाली. शहराच्या एकाही भागात ना रस्ते नीट आहेत ना नाल्या, मुतारी स्वच्छ आहेत. मात्र, हे वास्तव असले तरी कोणत्या नेत्याला,कोणत्या पदाधिकाऱ्याला दोषी ठरवायचे, याबाबत नागरिक कन्फ्युज आहेत. कारण सत्ताधारी आणि विरोधक, दोन्ही पक्षांकडून प्रत्येक वेळी दावे प्रतिदावे केले जातात. मात्र, विकासकामे होत नाहीत. एखाद्या खेड्यापेक्षा धाराशिव शहराची अवस्था भयंकर आहे. ऐन पावसाळ्यात कचऱ्याने शहराची दुर्दशा दाखवून दिली आहे. त्यामुळे त्यामुळे आणखी एकदा शहराचे नाव बदलून कचराबाद करण्यात यावे,अशी मागणी सामान्य नागरिक करत आहेत. लोकसभेला महाविकास आघाडीमध्ये सहभागी असलेल्या आम आदमी पक्षाने शहरातील दुर्दशा दाखवून देण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.मात्र, या व्यवस्थेला जबाबदार कोण याचे उत्तर कुणाकडेच नाही. भुयारी गटारसाठी खोदलेल्या रस्त्यांनी निसरडे तयार झाले आहेत. रस्त्यांची दुरुस्ती होणार म्हणून निधींचा पाऊस पडल्याच्या बातम्या नागरिकांच्या कानावर पडल्या होत्या. पण कामे होताना दिसत नाहीत. नागरिकांना मात्र भोग भोगावेच लागत आहेत. आम आदमी पक्षाने शहरातील बसस्थानक आणि वेगवेगळ्या भागातील कचऱ्याची समस्या दाखवून दिली असली तरी या व्यवस्थेत आमूलाग्र बदल दिसण्यासाठी आता नागरिक नव्याचा शोध घेत आहेत.

# एकाच दिवसात ४७ गायींची पोलिसांकडून मुक्तता

## तीन वाहनासह १७ लाख ४४ हजारांचा मुद्देमाल जप्त

आरंभ मराठी | धाराशिव

**गोवंशीय जनावरांच्या अवैध वाहतुकीचा मुद्दा धाराशिव जिल्ह्यात पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. दर दोन चार दिवसाला गोवंशीय जनावरांच्या अवैध वाहतुकीवर छोट्या-मोठ्या कारवाया केल्या जातात मात्र, तरीही पोलिसांचा वचक राहिला नसून, राजरोसपणे कत्तलीच्या उद्देशाने गाईंची वाहतूक केली जात असल्याचे दिसते. मंगळवारी (दि.८) एकाच दिवसात तीन वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांनी केलेल्या कारवाईत तब्बल ४७ गाईंची पोलिसांनी अवैध वाहतूक करताना पोलिसांनी तीन वाहनांवर कारवाई केली. यावेळी १७ लाख ४४ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

धाराशिव जिल्ह्यात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गोवंशीय जनावरांची निर्दय वाहतूक करून कत्तलीसाठी नेण्यात येत असताना पोलिसांनी वेळीच कारवाई केली आहे. तीन वेगवेगळ्या पोलीस स्टेशननी एकाच दिवसात केलेल्या कारवाईत १७ लाख ४४ हजार रुपयांच्या किंमतीच्या ४७ गाई पकडण्यात आल्या आहेत. यावेळी पोलिसांनी त्वरित वाहन ताब्यात घेतले आणि गोवंशीय जनावरांची सुटका केली. यातील पहिल्या प्रकरणात बेकायदेशीर गोवंशीय जनावरांची वाहतूक करणाऱ्या व्यक्तीवर वाशी पोलिसांनी कारवाई करून पाच गाईंची सुटका केली. यातील आरोपी किरण तायाप्पा शिंदे (वय ३८ वर्षे, रा. परंडा) हा दिनांक ८ जुलै रोजी इंदापुर शिवारातील भैरवनाथ साखर कारखान्या समोर हायवे रोडवर पिकअप (क्र एमएच १३ डी क्यु ०७०६) मध्ये गोवंशीय जातीच्या ३ जर्सी गायी १ खिल्लार जातीची गाय व १ गिर गाय असा वाहनासह एकूण ३,५०,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. यावरुन वाशी पोलीसांनी ते वाहन जप्त करून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला व गाईंची सुटका केली. दुसऱ्या प्रकरणात परंडा पोलिसांनी कारवाई करून २६ गाईंची अवैध वाहतूक होताना कारवाई केली. यावेळी पिकअप वाहनात (क्र एमएच ११ बीएल ४४०९) दिनांक ८ जुलै रोजी वारदवाडी ते भूम या रोडवर वाहनामध्ये गोवंशीय जातीच्या ४ जर्सी गायी आणि २२ वासरे कत्तलीसाठी घेऊन जात असताना पोलिसांनी कारवाई केली. यावेळी २,१०,००० रुपये किंमतीच्या वाहनासह ५,१०,००० रुपये किंमतीच्या गाई पोलिसांनी ताब्यात घेतल्या. यावेळी परंडा पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. तिसऱ्या प्रकरणात भूम पोलिसांनी कारवाई करत १६ गाईंची सुटका केली. दिनांक ८ जुलै रोजी रात्रीच्या वेळी आयशर टेम्पोत (क्र एमएच १३ ए एक्स ३१३२) मध्ये शासकीय दुध डेअरी भुम येथे गोवंशीय जातीच्या १२ जर्सी गायी आणि ४ वासरे घेऊन जात असताना कारवाई केली. यावेळी १,८४,००० रुपये किंमतीच्या वाहनासह ८,८४,००० रुपये किंमतीच्या कत्तलखान्यात जाणाऱ्या गाई ताब्यात घेण्यात आल्या. पोलीसांनी सरकारतर्फे वाशी, परंडा आणि भूम पोलीस ठाण्यात कलम ९, ५ प्राणी संरक्षण अधिनियम सह प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(ड),(इ)(ई)(ऐ)(ठ) अन्वये तीन गुन्हे नोंदवले आहेत.

### गोवंशीय जनावरांसह गोमांसाच्या वाहतुकीवर नियंत्रण नाही

जिल्ह्यात सर्वत्र गोवंशीय जनावरांसह गोमांसाची वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत आहे. मागील आठवड्यात एका वाहनात तब्बल तीन टन गोमांसाची वाहतूक होत असताना धाराशिव शहर पोलिसांनी कारवाई केली होती. धाराशिव शहरातील वैराग रोड परिसरात गोवंशीय जनावरांची राजरोसपणे वाहतूक होत असताना पोलिसांकडून मात्र एखाद्याच वेळी कारवाईचा फार्स केला जातो. महामार्गावरून वाहनाला ताडपत्री बांधून गोवंशीय जातीच्या जनावरांची वाहतूक केली जात असल्याचे दिसते. मात्र पोलिसांकडून एखाद्याच गाडीवर कारवाई केली जाते. धाराशिव, भूम आणि परंडा या तीन तालुक्यात मोठ्या प्रमाणात गोवंशीय जनावरांची आणि गोमांसाची वाहतूक केली जाते. मात्र, आठवड्यातून एखादीच कारवाईकेलीजाते.



# डोळ्यात तिखट टाकून तरुणाला लुटले

आरंभ मराठी | परंडा

सायंकाळी शेताकडे जात असलेल्या तरुणाला रस्त्यावर अडवून त्याच्या डोळ्यात तिखट टाकून त्याच्याजवळील सोने आणि रोख रक्कम असा जवळपास चार लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची धक्कादायक घटना परंडा तालुक्यात घडली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, फिर्यादी दशरथ सुग्रीव गोरे (वय २७ वर्षे, रा. रा. कारंजा ता. परंडा) हे दिनांक ७ जुलै रोजी सायंकाळी साडेसहा वाजता दुकान बंद करुन त्यांच्या मोटारसायकलवरुन परंडा शिवाररातील शेताकडे परंडा कुर्डूवाडी रोडने जात होते. त्यावेळी बिगर नंबरच्या पांढऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओ गाडीमधील तीन अनोळखी व्यक्तींनी फिर्यादीच्या मोटार सायलला पाठीमागून धडक देवून त्यांच्या डोळ्यात मिर्ची पुड टाकली. तसेच त्यांना लोखंडी रॉडने मारहाण करुन दशरथ गोरे यांच्या जवळील ५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ४७,००० हजार असा एकुण ३,९७,००० रुपये किंमतीचा माल बळजबरीने हिसकावून नेला. दशरथ गोरे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०९ (६), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# चाळीस वर्षीय महिलेवर लैंगिक अत्याचार

आरंभ मराठी | बेंबळी

धाराशिव तालुक्यातील एका गावातील चाळीस वर्षीय महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, एका गावातील ४० वर्षीय महिला (नाव- गावगोपनीय) दिनांक ७ जुलै रोजी रात्रीच्या वेळी घरी एकटी झोपली असताना गावातील एका तरुणाने तिच्या घरी येवून तिला मारहाण करुन बळजबरीने तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. पिडीत महिलेने दिनांक ८ जुलै रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम-६४, ३३३, ११५(२), ३५१(२)(३) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# तुळजाभवानी मंदिरातून भाविकाचे तीन तोळ्याचे दागिने चोरीला

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर येथील तुळजाभवानी मंदिरात दर्शनासाठी आलेल्या महिला भाविकाचे तीन तोळे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, जिजाबाई शिवराम आहीरे (वय ७३ वर्षे, रा. छत्रपती संभाजी नगर ) या ८ जुलै रोजी सकाळी साडे अकरा वाजता श्री. तुळजाभवानी मंदीर तुळजापूर येथे देवदर्शनासाठी आल्या होत्या. त्यावेळी मंदीर परिसरातून जिजाबाई आहीरे यांच्या गळ्यातील ३० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने अंदाजे १,५०,००० रुपये किंमतीचे अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. जिजाबाई पाटील यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# कवठा शिवारातील जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

### १७ लाख ५८ हजारांचा मुद्देमाल जप्त; १२ जणांवर गुन्हा दाखल

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा तालुक्यातील कवठा शिवारातील जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून तब्बल १७ लाख ५८ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. यावेळी घटना स्थळावरून जुगार खेळणाऱ्या १२ आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, उमरगा येथील उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या पथकाने गुप्त माहिती मिळाल्यामुळे दिनांक ८ जुलै रोजी विभागीय पोलीस अधिकारी सदाशिव शेलार यांच्या नेतृत्वाखाली उमरगा तालुक्यातील कवठा येथील शिवारातील दयानंद सोनवणे यांच्या शेतातील गोठ्यावर सायंकाळी छापा टाकला. यावेळी त्या ठिकाणी तिरट जुगार खेळणाऱ्या १२ लोकांवर कारवाई केली. यावेळी शाम निशीकांत काळे, समीर सर्फराज शेख, आकाश राम कदम, महेश मोहन काळे, किशोर बालाजी ननुरे, कैलास शेषेराव पुजारी, गोपाळ पंड पंजारी, हबीब दस्तगीर सय्यद, दत्ता पुन्नु चव्हाण,जितेंद्र ज्ञानोबा काळे, विवेकानंद शंकरराव सोनवणे, सचिन हरिदास गायकवाड हे जुगार खेळत असताना पथकास मिळुन आले. पथकाने नमूद जुगार अड्ड्यावरुन जुगार साहित्यासह ३ कार, ९ मोबाईल फोन व रोख रक्कम १३,९०० असा एकुण १७,५८,६९० रुपये किंमतीचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त केला. त्या ठिकाणी जुगार खेळणाऱ्या व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-४, ५ अंतर्गत उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांच्या आदेशावरुन उमरगा उप विभागाचे सदाशिव शेलार यांच्या मार्गदर्शनाखालीउपविभागीयपोलीसअधिकारी कार्यालय, उमरगा यांच्या पथकाने केली.

# जिल्ह्यातील पाऊण लाख शेतकऱ्यांना ५५ कोटी रूपये अतिरिक्त मिळणार

## खरीप हंगामातील नुकसानीपोटी विमा कंपनीमार्फत भरपाई,आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

आरंभ मराठी | धाराशिव

गेल्यावर्षी (२०२४) खरिपात काढणी पश्चात पिकांच्या झालेल्या नुकसानीपोटी विमा कंपनीमार्फत अतिरीक्त भरपाई मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य सरकारने विमा कंपनीला १ हजार कोटींचा अंतिम हप्ता देण्यास मंजुरी दिली असून, यामुळे धाराशिव जिल्ह्यातील ७५ हजार ६७७ शेतकऱ्यांना ५५ कोटी रुपये मिळणार आहेत, अशी माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.गेल्या हंगामात नैसर्गिक आपत्तींमुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी, यासाठी राज्य शासनाच्या अंतिम हप्त्याच्या १००० कोटी निधीच्या प्रस्तावाला उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी मंजुरी दिली आहे. यामुळे खरीप हंगाम २०२४ अंतर्गत काढणीपश्चात झालेल्या नुकसानीपोटी शेतकऱ्यांना लवकरच भरपाई मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सदर रक्कम विमा कंपन्यांना वितरित केल्यानंतर राज्यातील लाखो शेतकऱ्यांना भरपाई मिळण्यास सुरुवात होणार आहे,असे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी सांगितले.ते म्हणाले, जिल्ह्यातील ७८ हजार ८१२




शेतकऱ्यांनी काढणी पश्चात नुकसानीच्या तक्रारी दिल्या होत्या. पंचनाम्याअंती यातील ७५ हजार ६७७ पात्र शेतकऱ्यांना ५५ कोटी वितरित करण्यात येणार आहेत. ज्या अधिसूचित क्षेत्रात, मंडळामध्ये २५% पेक्षा जास्त तक्रारी आलेल्या आहेत, अशा क्षेत्रातील शेतकऱ्यांना नुकसानीच्या प्रमाणात प्रति हेक्टरी ६२०० ते ६५०० रुपये तर इतर मंडळातील शेतकऱ्यांना वैयक्तिक स्तरावरील पंचनाम्यानुसार झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने प्रति हेक्टरी ८००० ते ८५०० दरम्यान नुकसान भरपाई मिळेल अशी अपेक्षा आहे. राज्य शासनाचा हिस्सा विमा कंपन्यांकडे हस्तांतरित केल्यानंतर लवकरात लवकर ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यासाठी पाठपुरावा सुरूच राहील.

### शासनाला २,३०० कोटींचा परतावा, पण शेतकऱ्यांसाठी रक्कम वापरणार



प्रधानमंत्री पीकविमा योजनेअंतर्गत विमा कंपन्यांना देण्यात आलेल्या एकूण ७६०० कोटींच्या हप्त्यातून, नुकसान भरपाई वगळता उरलेली रक्कम वजा करून २० टक्के रक्कम ही विमा कंपन्यांना दिली जाते. या प्रक्रियेतून उरलेले सुमारे २३०० कोटी हे राज्य शासनाला प्राप्त होणार आहे. ही रक्कम पुनश्च शेतकऱ्यांसाठीच वापरण्याचा राज्य शासनाने मोठा निर्णय घेतला आहे.

**राणा जगजितसिंह पाटील, आमदार**

# सहा हज़ार रूपयांची लाच घेणाऱ्या वीज तंत्रज्ञाला ४ वर्षांची सक्तमजुरी

आरंभ मराठी | धाराशिव

नवीन वीज कनेक्शनसाठी २०१७ मध्ये ६ हजार रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या तंत्रज्ञाला प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. सी. खटी यांनी दोषी ठरवत ४ वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा सुनावली. तसेच ५ हजार रुपये दंडाची देखील शिक्षा ठोठावली आहे.जिल्हा सरकारी वकील ॲड.महेंद्र देशमुख यांनी या खटल्यात बाजु मांडली होती.बुधवारी या खटल्याचा निकाल देण्यात आला.

खटल्याची हकीकत अशी की, फिर्यादी योगेश बळिराम कानडे यांच्या वहिनीच्या नावे तुळजापूर तालुक्यातील काक्रंबा येथील घरी नवीन विद्युत कनेक्शन घेण्यासाठी कागदपत्रे आरोपीकडे देण्यात आली होती. त्यावेळी त्यांनी कागदपत्रे जमा न करता स्वतःकडे ठेवून घेतली व डिमांड घेतल्यानंतर नविन विद्युत कनेक्शन देण्यासाठी आरोपी प्रदीप काकासाहेब साठे (तंत्रज्ञ, नेमणूक तुळजापूर ग्रामीण) याने तक्रारदार यांच्याकडून नवीन विद्युत कनेक्शन घेण्यासाठी लागणारा सर्वे रिपोर्ट देण्यासाठी ७ जानेवारी २०१७ रोजी सहा हजार रुपये लाचेची मागणी केली होती.




आरोपीने १६ जानेवारी २०१७ रोजी दुपारी साडेबारा वाजता पंच साक्षीदारा समक्ष सहकारी तंत्रज्ञासोबत लाच स्वीकारली होती. त्यामुळे आरोपी लोकसेवक प्रदिप काकासाहेब साठे याच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक कायदा कलम १९८८ कलम ७,१३ (१) (ड) सह १३(२) अन्वये पोलीस स्टेशन तुळजापूर येथे गुन्हा रजि. नंबर १८/२०१७ अन्वये गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणाचा तपास पोलिस निरीक्षक बी. जी. आघाव यांनी केला व तपासाअंती मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाले आणि प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयात प्रकरणाची सुनावणी घेण्यात आली.प्रकरणामध्ये अभियोग पक्षाच्या वतीने जिल्हा शासकीय अभियोक्ता महेंद्र बी. देशमुख, यांनी एकूण चार साक्षीदारांचे जबाब नोंदविले अभियोग पक्षातर्फे देशमुख यांनी घेतलेल्या साक्षीदारांचा पुरावा ग्राह्य धरुन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. सी. खटी यांनी आरोपी प्रदिप काकासाहेब साठे याला चार वर्षे सक्त मजुरी व पाच हजार रुपये दंड तसेच दंड न भरल्यास ९ महिने साधी मजुरी अशी शिक्षा बुधवारी सुनावली.

CMYK


दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

संपादकीय गुरूवार,दि. 10 जुलै 2025

# गुरूंना त्रिवार वंदन करण्याचा दिवस: गुरुपौर्णिमा

**भारतात** आषाढ पौर्णिमा ही गुरुपौर्णिमा म्हणून मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. या दिवशी गुरुंना वंदन केले जाते, त्यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त केली जाते. आईवडील हे प्रत्येक व्यक्तीचे पहिले गुरू असतात.त्यांच्या मार्गदर्शनाखाली आपले जीवनविश्व सुरू होते. आईवडील, वडीलधारी मंडळी, नातेवाईक, शाळेतील शिक्षक, कॉलेज मधील प्राध्यापक हे सगळे आपले गुरू असतात. यांनी जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर आपल्याला ज्ञान दिलेले असते. जीवनाचा सन्मार्ग दाखवलेला असतो. आपल्या हातून एखादी चूक झाली की, त्यांनी आपले कान पिळलेले असतात. प्रसंगी पाठीत एखादा धपाटा घातलेला असतो. तेव्हा आपण वाईट वळणे सोडून सरळ वाट धरलेली असते. आपल्या गुरुंनी निकोप भावनेने आपल्याला घडवलेले असते. चांगले काय नि वाईट काय यातला फरक गुरुंमुळे समजतो. अशा गुरुंना त्रिवार वंदन! ज्ञानाचे चालते बोलते विद्यापीठ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांना आपले गुरू मानले होते. त्यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार बाबासाहेबांनी जीवनभर केला. आणि गुरूंना वंदन करून कृतज्ञता व्यक्त केली आहे. बाबासाहेबांचे तीन गुरू आणि त्या गुरुंचा एक शिष्य हे अद्भूत नाते अन्य कोठे



पाहायला मिळत नाही. गुरु शिष्याचे नाते हे एक अलौकिक व आपुलकीचे नाते असते. हे नाते भारतीय संस्कृतीत सर्व श्रेष्ठ नाते आहे. ह्या नात्यांना सर्वांनी जीवापाड जपले पाहिजे. या नात्याचे पावित्र्य आपण सर्वांनी अबाधित ठेवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत. कारण आजचे उणाड शिष्य आणि कर्तृत्वाचा ठसा न उमटवणारे गुरू पाहिले की, मनाला खूप वेदना होतात!गुरुपौर्णिमे दिवशी मला माझ्या गुरुंची आठवण हमखास होते, कारण माझे सर्व गुरू अतिशय कर्तृत्ववान, चारित्र्यवान आणि ज्ञानसंपन्न होते. माझ्या गुणवान व प्रतिभावान गुरुंना त्रिवार वंदन! जि.प.प्राथमिक शाळा उमरगा कोर्ट या शाळेत माझे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाले.या शाळेतील समांधे सर, भोरे सर, गंगाधरराव मोरे, भाऊराव डोंगरे आणि व्यंकटराव घुमाडे यांनी आमच्या शैक्षणिक जीवनाचा पाया रचला. माझे माध्यमिक शिक्षण गावातील शांतिनिकेतन विद्यालयात पार पडले. या शाळेतील सर्व शिक्षक अतिशय गुणसंपन्न व ज्ञानी होते. गणेशराव गुळवे गुरुजी, बंकटराव गरड, संभाजीराव परगे, अप्पाराव लोहारे, अनंतराव बोरोळे, विश्वनाथ चलवाड, वाय.एम.पाटील, राम राव सोमवंशी, दत्तात्रय सोमवंशी, हणमंत कांडमगीरे, तुकाराम दापके हे आमचे शिक्षक शिक्षकी पेशाचे पावित्र्य जपणारे होते. देशाची व समाजाची एकेक पिढी घडविण्यासाठी अहोरात्र कार्यरत होते. या शिक्षकांमुळे गोरगरीब व तळागाळातील विद्यार्थ्यांच्या जीवनाचे सोने झाले. अनेक घरचे दारिद्र्य संपले. असे कार्यतत्पर शिक्षक लाभणे म्हणजे आम्हा विद्यार्थ्यांचे थोर भाग्यच जणू. आमचे हे शिक्षक आमचे दीपस्तंभ होते. गुरुपौर्णिमेनिमित्त आमच्या या गुणवान गुरुंना त्रिवार वंदन! त्यांच्या शैक्षणिक कार्याचा आम्हाला आजही सार्थ अभिमान वाटतो. स्वत:चा स्वार्थ बाजूला ठेवून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी जीवाचे रान करणाऱ्या सर्व गुरुंना गुरुपौर्णिमेच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!



**बबन दामोदर गुळवे**
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर.मो.९५४५४४२६४८.

# दोन राज्य मार्गावर गतिरोधक बसवा, नाली दुरुस्ती करा

## तेर ग्रामपंचायतची बांधकाम विभागाकडे मागणी



**आरंभ मराठी | तेर**

धाराशिव तालुक्यातील तेर गाव हे कायमस्वरूपी गजबजलेले व वाहतुकीचे वर्दळीचे गाव आहे. या गावातून सार्वजनिक बांधकाम विभागाचे दोन राज्य मार्ग ज ातात. या दोन्हीही मार्गावर तातडीने गतिरोधक बसवण्याची व रस्त्या लगत असलेल्या नालीच्या बांधकामाची दुरुस्ती करण्याची मागणी ग्रामपंचायत कार्यालयाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे. संत गोरोबा काका समाधी मंदिर, कै. रामलींगप्पा पुराणवस्तू संग्रहालय, जैन मंदिर, त्याचप्रमाणे शाळा महाविद्यालय याच मार्गावर असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी ठिकठिकाणी गतिरोधक बसवण्याची आवश्यकता आहे. परंतु, सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे दुर्लक्ष केले असल्याचे दिसून येत आहे. धाराशिव-वरूडा-तेर राज्य मार्गावर असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने करण्यात आलेल्या नालीच्या बांधकामाची दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने सरपंच दिदी लोकेश काळे यांनी संबंधित विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# ..अशी बोलते कविता

**सर्व** वाचक मित्रांना सप्रेम नमस्कार खूप दिवसांच्या विरामानंतर पुन्हा एकदा हे सदर सुरू करत आहे. मागे जेंव्हा ही लेखमाला सुरू होती तेंव्हा काही शिक्षक मित्रांनी मला शालेय अभ्यासक्रमात असलेल्या कवितांचं रसग्रहण करण्यासाठी सुचवलं होतं. ते माझ्याकडून करायचं राहील होतं. आता हे शैक्षणिक वर्ष तसं तर संपत आलेलं आहे. पण हे रसग्रहण पुढील वर्षात विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि इतरही मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्या वाचकांना उपयोगी पडेल अशी आशा आहे.शालेय अभ्यासक्रमात प्रत्येक वर्गाला संतवाणी या शिर्षकाखाली काही अभंग अभ्यासण्यासाठी दिलेले असतात. अनेक शिक्षक बांधव मोठ्या आस्थेने , अभ्यासपूर्ण अध्यापन करून मुलांपर्यंत संतांचे विचार, त्यांची शिकवण पोहोचवतात. काही ठिकाणी मात्र हा पुस्तकातला शेवटचा भाग दुर्लक्षितही राहतो. किंवा जसा तो पोहोचायला हवा तसा पोहचत नाही. असो.इयत्ता सातवीच्या अभ्यासासाठी संत कान्होपात्रा यांचा एक सुंदर असा अभंग दिला आहे. हा अभंग समजून घेण्याआधी आपण कान्होपात्रा यांचं जीवनचरित्र समजून घेण्याची गरज आहे. आणि मुलांपर्यंत सुद्धा ते पोहोचलं पाहिजे. ज्या कौटुंबिक, सामाजिक वातावरणात त्या जन्मल्या, वाढल्या, संघर्ष केला आणि शेवटी संतपदाला पोहोचल्या ते पाहणं महत्वाचं आहे. पंढरपूर जवळ मंगळवेढा नावाच्या गावी एका श्यामा नावाच्या नायकीण किंवा गणिका असणाऱ्या महिलेच्या पोटी कान्होपात्राचा जन्म झाला. परिस्थिती सधन असली तरी समाजात स्थान मात्र अत्यंत हीन दर्जाचे. तुच्छतेचे. कान्होपात्रा दिसायला अत्यंत सुंदर होत्या. गायन आणि नृत्यात निपुण होत्या पण ते कला म्हणून नव्हे तर त्यांच्या व्यवसायाची गरज म्हणून. कान्होपात्रानेही तरुण वयात बिदरच्या राजदरबारी नायकीण म्हणून राहावे अशी तिच्या आईची सुद्धा ईच्छा होती. पण कान्होपात्रा मात्र या सगळ्यापासून दूर राहू इच्छित होत्या. त्यांना भक्तिमार्ग हवा होता. वृत्ती विरक्त होती. विठ्ठलाच्या ओढीने त्यांचे मन व्याकुळ होतं असे. त्यांना या परिस्थितीतून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी खूप संघर्ष करावा लागला. हौसा नावाच्या एका दासीच्या मदतीने ती घरातून निसटली आणि वारकऱ्यांच्या दिंडीत सामील होऊन पंढरपूरला पोहोचली. तिथेच राहू लागली. विठ्ठलाच्या भक्तीत रममाण झाली. मात्र बिदरच्या राजाचे सैन्य तिच्या शोधत तिथेही आले.

नको देवराया अंत आता पाहू।
प्राण हा सर्वथा फूटो पाहे।

अशी आर्त हाक तिने देवाला मारली. पांडुरंगाने खरोखरच तिचे या संकटातून रक्षण केले.ज्या काळी समाजामध्ये जातीभेद, अस्पृश्यता पाळली जायची. मंदिरात प्रवेशाला मनाई असायची . अशा काळात समाजातल्या एका अत्यंत दर्जाहीन घटकात जन्माला आलेल्या मुलीला पंढरीश विठ्ठलाने आपल्या मंदिरात कायमस्वरूपी स्थान दिले. आजही या मंदिरात कान्होपात्रेचा वृक्ष आहे. जाणारे सर्व भाविक या तरट वृक्षाचे आवर्जून दर्शन घेतात.

माझे माहेर पंढरी ।
सुखे नांदू भीमातीरी ।।१।।
येथे आहे मायबाप ।
हरे ताप दरुशने ।।२।।

पंढरपूर हे माझं माहेर आहे असं म्हणताना ते कान्होपात्रा साठी माहेर म्हणून किती महत्त्वाच असेल याची जरा कल्पना करूया. ज्या घरात तिचा जन्म झाला तिथलं वातावरण आणि नंतर तिच्याकडून केलेली अपेक्षा पाहता तिला ते माहेर वाटेल का? म्हणून ज्या विठ्ठलाच्या चरणी तिला थारा मिळाला तेच तिचे खरे माहेर. भिमातीरी असणार विठ्ठलाच स्थान हे माझ्यासाठी सुखाचं आहे. विठ्ठल हाच माझा मायबाप आहे. त्याच्या केवळ दर्शनानेच माझे सगळे त्रास, ताप नाहीसे होतात.

निवारिली तळमळ चिंता ।
गेली व्यथा अंतरीची ।।३।।
केशी विटेवरी शोभली ।
पाहुनी कान्होपात्रा धाली ।।४।।

माझ्या मनातील सगळी चिंता आणि तळमळ विठ्ठलाने निवारण केली आहे. आता मला कोणतीही काळजी नाही. विटेवर उभा असणारा माझा मायबाप विठ्ठल कसा शोभून दिसतो. त्याला पाहून मी समाधानी होते. असा या अभंगाचा भावार्थ आहे. जो त्याच्या भक्तीत लीन होतो त्याला तो जवळ करतो. तिथे तो जातपात , धर्म, कुळ गोत्र काहीही पहात नाही. म्हणूनच या लेकुरवाळ्या विठुच्या गोपाळांमध्ये सर्व गटातील भक्त सामील आहेत.प्रत्येक संतांनी आपल्या अभंगांमधून विठ्ठलाच्याप्रती आपल्या अशाच भावना व्यक्त केल्यात. त्यांच्यासाठी विठ्ठलच त्यांचा मायबाप, बंधू, मित्र , सखा आणि काहीवेळा तर तो प्रियकर किंवा पती देखील असतो.इतके प्रगल्भ ,चिंतनशील, विद्वान, तपस्वी संत विठ्ठलाच्या भक्तीत इतके रममाण होतात. इतकी ओढ त्यांना पांडुरंगाची वाटते म्हणजे त्यात नक्कीच काहीतरी अर्थ आहेच. पण तो केवळ बुद्धीने जाणता येणार नाही तो जाणून घ्यायचा असेल तर मनोभावाने जाणावा लागतो. त्याच्याशी एकरूप व्हावं लागतं.



**रामचंद्र भालचंद्र आरडले**
मो. ९४२३८२७२३६

# स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी

**परमेश्वराला** प्रत्येक घरात राहणे शक्य नसल्याने, त्याने 'आई' नावाची माऊली निर्माण केली. झाल्याशिवाय कोणत्याच स्त्रीला पूर्णत्व येत नाही, म्हणूनच 'आई होणे' हे प्रत्येक स्त्रीचे स्वप्न असते. ज्या स्त्रीला अपत्यप्राप्ती होत नाही, तिला आईपणाचे दु:ख काय असते? हे तिच्या तिलाच माहीत. आई होण्यासाठी अशा स्त्रिया व्रतवैकल्ये, उपवास, गंडेदोरे काहीही करण्यास तयार असतात.अपत्यप्राप्तीसाठी लाखो रुपये खर्च करणा-या अनेक स्त्रियाही आपण समाजात बघतो. फक्त 'आई' हा शब्द ऐकण्यासाठी त्यांचे कान आसुसलेले असतात. स्त्री ही 'क्षणाची पत्नी तर, अनंतकालाची माता' असते, असे म्हटले जाते. एक प्रेयसी आपल्या प्रियकराकडे त्याच्या आईच्या काळजाची मागणी करते. तो प्रियकर स्वतःच्या आईला ठार मारून हातात काळीज घेऊन प्रेयसीकडे धावत धावत जात असतो. रस्त्यात त्याला ठेच लागून तो खाली पडतो. हातातील काळीज खाली पडते, तेव्हा त्या काळजातून 'बेटा तुला फार लागले तर नाहीना? असा आवाज येतो. आईचे हृदय किती विशाल असते, हे सांगणारी ही गोष्ट प्रत्येकाने लहानपणी ऐकली असेलच. सांगावी तितकी कमीच महती 'आई' या दोन अक्षरांची आहे. म्हणूनच 'आईविना भिकारी स्वामी तिन्ही जगाचा' असे म्हणतात. हे सर्व नमूद करण्याचे कारण म्हणजे 'स्त्री' जातीला आणि 'आई' या पवित्र शब्दाला कलंक लावणा-या काही स्त्रिया समाजात वावरत असतात. आठ दिवसांपूर्वी पनवेल येथे एक नवजात अर्भक बेवारस अवस्थेत सापडले होते. ही हृदय पिळवटणारी घटना नजरेआड जात नाही तोच, ठाणे येथील दिवा हद्दीतील अतिशय हृदयद्रावक घटना समोर आली. 'आई' म्हणावे की 'हैवान'? असा प्रश्न पाडणारी एक स्त्री (?) आपल्या ४ वर्षांच्या सख्खा मुलीला उलथणीने अतिशय निर्घुणपणे सपासप मारत असल्याचे वृत्त बघून अंगावर अक्षरशः शहारे आले. बिचारा कोवळा जीव अक्षरशः गडाबडा लोळत जीवाच्या आंकातने मारू नकोस, अशी भीक मागत होता. परंतु, या पाषाणहृदयी हैवान बाईला अजून चेव येत होता. तिच्या छातीवर पाय ठेवून, तिच्या केसाला धरून ओढत, लागेल तिथे उलथणे वाकडे होईपर्यंत ती सपासप वार करतच राहिली. तिच्या सावत्र मुलीने या घटनेचा



व्हिडिओ काढून व्हायरल केला, म्हणून त्या अभागी जिवाचा जीव वाचला. ही काही आज घडलेली एकमेव घटना नाही. काही महिन्यांपूर्वी अलिबाग तालुक्यातील किहीम गावातील एका पंचवीस वर्षे वयाच्या महिलेने आपली पाच वर्षे वयाची मुलगी आराध्या आणि तीन वर्षे वयाच्या सार्थक नावाच्या दोन्ही मुलांचा झोपेतच मृत्यू झाल्याचे सांगितले. पोलिसांना तिचे म्हणणे पटले नाही. त्यांनी सखोलपणे चौकशी केली असता, हृदय पिळवटून टाकणारे सत्य बाहेर आले. या महिलेचे तिच्या गावातील एका तरुणाशी अनैतिक संबंध होते. या संबंधांमध्ये आपली मुले तिला अडथळा वाटत होते. तिच्या प्रियकरालाही ही मुले आवडत नव्हती. तसेच आराध्या ही, 'आई सतत फोनवर कोणाशी तरी बोलत असते', अशी तक्रार आपल्या वडिलांकडे करत असे. अखेर, आपल्या अनैतिक संबंधांमधला अडथळा कायमचाच दूर करण्यासाठी या निर्दयी बाईने दोन्ही मुले झोपेत असताना, त्यांचा गळा दाबून त्यांना कायमचेच संपवून टाकले. मूल म्हणजे आईच्या काळजाचा तुकडाच नव्हे तर, जीव की प्राण असतो. आपल्या मुलाला साधे खरचटले किंवा काही काळ ते नजरेआड जरी झाले तर, ती कासाविस होते. आपल्या तान्हुल्यासाठी जीवाची बाजी लावणा-या हिरकणीची गोष्ट सर्वांनाच ठावूक असणार. आईच्या भरवशावर हसत-खेळत, बागडत पुढील भावी आयुष्याचे स्वप्न पाहणा-या, या निष्पाप, कोवळ्या जीवांना स्वप्नातही पुसटशी कल्पना आली नसेल की, आपली आईच आपल्यासमोर यम म्हणून उभी राहील. दु:खदायक बाब म्हणजे, या बयेला तिच्या प्रियकरासोबत संसार थाटायचा होता. मग, नव-याला घटस्फ़ोट देऊन हे सहजपणे शक्य झाले असते. त्यासाठी चिमुरड्या, निरागस, निष्पाप मुलांचे आयुष्य संपवण्याची काय गरज होती? आणि हे पाशवी कृत्य करताना हिचे हात का थरथरले नाहीत? अशा घटना अधूनमधून जगाच्या पाठीवर कोठेना कोठे घडतच असतात. त्याचप्रमाणे अनैतिक संबंधांतून जन्माला आलेला जीव, मुलगी झाली म्हणून 'नकोशी' समजून कचराकुंडीत फेकून देणा-या महिलांना काळीज असते की नाही? एवढा राग, क्रुरता, विकृतपणा हळव्या मनाच्या स्त्रीमध्ये येतो कसा? आणि कोठून? अशा महिला म्हणजे स्त्रीच्या रुपात जन्म घेतलेल्या विकृती असतात का? असे अनेक प्रश्न मन कुरतडल्याशिवाय राहत नाही. वाईट याचेच वाटते की, 'कोण करतो मजा, आणि कोणाला मिळते सजा'? समाजात स्त्रीला आदराचे स्थान देण्यात आले आहे. तिच्याविषयी कोणत्याही बाबतीत हलकी आणि समजूतदारपणाची भूमिका घेतली जाते. प्रत्येक गोष्टीत स्त्रीला प्रथम प्राधान्य दिले जाते. राजकारणातही आता त्यांचे आरक्षण वाढवण्यात आले आहे. हल्लीच्या युगात स्त्री-पुरुष असा भेदभावही आपण मानत नाही. पाहिजे तसे स्वातंत्र्यही तिला दिले जाते. तिचा एवढा 'मान-सन्मान' करूनही काही स्त्रिया 'आई' या पवित्र शब्दाला आणि स्त्री जातीस 'कलंक' का लावतात? हे न उलगडणारे कोडे आहे. कारण, 'एका स्त्रीच्या मनात नक्की काय चालू आहे? हे खुद्द ब्रह्मदेवही सांगू शकणार नाही' असे म्हणतात, असो. कदाचित, तिला दिलेले 'स्वातंत्र्य' आणि 'सोशल मीडिया'चा दुरूपयोग यामुळेच तर असे दुष्कृत्य काही महिलांच्या हातून घडत नसावे ना? अशी संशयाची पाल मनात चुकचुकल्याशिवाय राहत नाही. एक मात्र नक्की, असे 'माणुसकी'ला कलंक फासणारे दुष्कृत्य करणा-या प्रत्येक गुन्हेगार स्त्रीला कोणतीही दयामाया न दाखवता,अत्यंत कठोर शिक्षा होणे ही 'काळाची गरज' आहे. याबाबतीत ती एक स्त्री आहे, असा अजिबात विचार होता कामा नये. जेणेकरून, अशा प्रवृत्तींच्या महिलांत धाक, दहशत निर्माण होऊन त्या असे कृत्य करण्यास धजावणार नाहीत; आणि अजून काही निष्पाप जीव अत्याचाराला बळी पडणार नाहीत.

**प्रदीप व्ही. खोलमकर,**
नाशिक.
मो. ८७६७५९२९८०९.

# प्रेरणा व संस्कार देणारा प्रत्येक व्यक्ती आपला गुरू

**प्राचीन** काळापासून गुरूच्या स्मरणार्थ आषाढ महिन्यातील ''पौर्णिमा''साजरी करण्याची परंपरा गेल्या ५ हजार वर्षांपूर्वीची आहे.त्यामुळेच भारतात गुरूपौर्णिमेला आगळेवेगळे महत्व असल्याचे आपल्याला दिसुन येते.गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने सर्वांनीच गुरू या शब्दाचा मान-सन्मान करने अत्यंत गरजेचे आहे. कारण ''गुरू शिवाय ज्ञान नाही''ही म्हण सत्य आहे. गुरू पौर्णिमेचे महत्व जाणून चांगले विचार आचरणात आणायला हवे. गुरूचे महत्व म्हणजे ज्यांच्यापासुन आपल्याला चांगल्याप्रकारची चालना,गुण, शिक्षण, प्रशिक्षण, मार्गदर्शन, प्रेम, आपुलकी, प्रेरणा, संस्कार जिव्हाळ्याच्या गोष्टी इत्यादींचे जो व्यक्ती चांगले आणि महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करतो तोच आपला खरा गुरु समजायला पाहिजे.''आई-वडिल'' हे गुरू या परीभाषेपेक्षाही महान आणि मोठे आहेत. जो पर्यंत सुर्य-चंद्र-आकाश-पाताळ आहे तोपर्यंत आई-वडीलांचा मान गुरू पेक्षाही महान आहे आणि राहील यात दुमत नाही. कारण आई-वडीलां समोर सर्वच नतमस्तक होतात आणि व्हायला हवे. ज्याप्रमाणे संपूर्ण सृष्टी पृथ्वी मातेसमोर नतमस्तक होते. आई मायेचे पांघरूण घालुन मुला-मुलींना लहानाचे मोठे करते तर वडील संपूर्ण कुटुंबाची ढाल बनून कुटुंबाचे रक्षण करण्याचे काम करीत असतो. त्यामुळे आपण नेहमी पहातो की छोटी दुर्घटना घटना घडली तर आपण ''आईग'' म्हणुन आईला हाक मारतो यावेळी आईच्या रूपात सर्वच धावुन येतात. यामुळे आपले दु:ख कमी होते. त्याच्या विपरीत जर मोठी घटना घडली तर आपण ''बापरे'' म्हणतो. यावेळेस संपूर्ण गाव जमा होवुन वडिलांच्या रूपात धावुन येतो. अशाप्रकारे आई-वडीलांचे नाते किती महान व अनभिज्ञ आहे जगात दिसून येते. म्हणजेच या जगात जो आपले पालन-पोषन करतो तो आपला सर्वात मोठा गुरू आहे. वडिलांचे नाते किती महान आहे हे आपण समजू शकतो. त्याचप्रमाणे आपण नेहमी पहातो की आई-वडीलांचा अपमान कोनीही सहन करीत नाही आणि करणार नाही. अशा परिस्थितीत मुलं-मुली तुटून पडतात. यात खरे गुरु-शिष्याचे नाते दिसून येते. म्हणजेच जगाच्या पाठीवर सर्वात मोठे गुरू-शिष्याचे नाते म्हणजे आई-वडिलच. यात मोठा वाटा म्हणजे आई-वडीलांचे मुलांवरील संस्कार व मार्गदर्शन. यातुनच गुरू-शिष्याचा जन्म झाला. आई गुरूची भुमिका बजावुन वटवृक्षाच्या अफाट सावलीत मुलांची जोपासना



करते तर वडील याच वटवृक्षाचा पहारेकरी बनुन परिवाराचे जतन व संरक्षण करते.मानसाच्या आयुष्यात अनेक उतारा-चढाव येतात, कठीण समस्या येतात, सुख-दु:खाच्या घटना घडतात. याकरीता वेगवेगळ्या मार्गदर्शनासाठी प्रत्येकाला गुरूची आवश्यकता असते. कारण गुरू शिवाय संपूर्ण मार्ग अधुरा असतो.आपण शिक्षणाच्या क्षेत्रात जेव्हा पाय ठेवतो. तेव्हा शिक्षक आपला गुरुच असतो. कारण पुढील आयुष्याचे खरे मार्गदर्शन आपल्याला शिक्षकांपासुन मिळत असते. आपण शाळेतल्या पहिल्या पायरीपासुन तर शेवटच्या पायरीपर्यंत म्हणजे अंतीम शिक्षणापर्यंत शिक्षक आपला गुरूच असतो. कारण यांच्या पासुनच आपल्या बुध्दीमत्तेचा आणि पुढील वाटचालीचा मार्ग मोकळा होतो व आपल्याला पुढील दिशा आणि मार्ग दिसून येतात. त्याचप्रमाणे क्रीडाक्षेत्रात पदार्पण करतांना गुरूची अत्यंत आवश्यकता असते. कारण संपूर्ण क्रीडाक्षेत्राचे भवितव्य आपल्या गुरू विद्येवर अवलंबून असते. त्यामुळे आपण क्रीडाक्षेत्रात नेहमी पाहतो की, कुशलता, कर्तबगारी, उत्कृष्ट खेळाडू आणि पराक्रमी खेळाडू तयार करतांना गुरू-शिष्याची संपूर्ण कसोटी लावून आपली ताकद झोकल्या जाते. तेव्हाच पीटी उषा, कपिल देव, तेंडुलकर, दारासिंग,खली, मिल्खासिंग, मेजर ध्यानचंद, निरज चोपडा असे अनेक नामांकित व महान खेळाडू गुरूमुळेच तयार झाले आणि होतात सुध्दा. गुरूच्या परीक्षेत जो-जो पास होतो. तीच शिष्यांकडून गुरू दक्षिणा असते. आपण महाभारत ते रामायणमध्ये गुरू-शिष्याचे काय नाते असते ते आपण जाणतोच. व्दापरयुग,सत्ययुग,कलयुग किंवा कोणतेही युग असो गुरू शिवाय पुढचा मार्ग निघने अवघड असते.याकरीता गुरूची आवश्यकता असने गरजेचे असते.राजकीय क्षेत्राचा विचार केला तर यातही आपल्याला गुरू-शिष्याचे नाते दिसून येते.यातुन राजकीय पुढारी तयार होतात.आपण पारतंत्र्यात असतांना स्वतंत्र लढा जिंकण्यासाठी क्रांतीकारकांनी आपल्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र्याचा लढा उभा केला. त्यामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात राहून मोकळा स्वास घेवु शकतो. कारण क्रांतीकारकांना गुरूचे मार्गदर्शन योग्य लाभले त्यामुळेच क्रांतिकारक शिष्यांनी भारताला स्वतंत्र मिळवून दिले. त्यामुळे गुरू शिवाय कोणतेही काम होने शक्य नाही. याकरीता कोणतेही क्षेत्र असो अनुभव, ज्ञान, माहीती मिळवण्यासाठी गुरूची तेवढीच आवश्यकता असते. म्हणुनच म्हटल्या जाते ''गुरू बिना ज्ञाण अधुरा''. त्याचप्रमाणे आपण पुजाअर्चना करतो याचे मुख्य कारण म्हणजे एकाग्रता निर्माण व्हावी. आपण आपले काम फत्ते व्हावे याकरिता देवी-देवता व पुर्वजांची पुजाअर्चना करतो. कारण आपण केलेल्या कार्याला यश प्राप्त झाले पाहिजे. भारत भुमित गौतम बुद्ध, ऋषीमुनी, त्यागी, साधुसंत, थोरमहात्मे होवुन गेले. याच्याच पाऊलावर पाऊल ठेवून योगा व व्यायामाच्या मदतीने आपले शरीर सुदृढ आणि निरोगी ठेवण्यासाठी प्रयत्नशील असतो. त्यामुळे आज भारताला योगाच्या बाबतीत विश्व गुरू म्हणुन संबोधले जाते. त्याचप्रमाणे भारताला विश्व शांतीचा गुरू सुध्दा संबोधल्या जाते.कारण जगाच्या पाठीवर शांतीपूर्ण देश म्हणजे भारताची जगात प्रचीती आहे. म्हणजेच आज भारत विश्व शांतीचा गुरू असल्याचे दिसून येते. ह्या संपूर्ण घटनांचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, परंपरा, संपूर्ण धर्माची जोपासना यामुळेच भारताला विश्व गुरू म्हणून संबोधल्या जाते. गुरू पोर्णिमेच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की मुलांनी आई-वडीलांच्या सेवेला,त्यांच्या आज्ञेला व त्यांनी सांगितलेल्या कामाला प्रथम प्राधान्य देवून गुरू-शिष्याच्या नात्याची जोपासना सर्वांनीच केली पाहिजे.आताही भारतात गुरू शिष्याचे नाते अतूट आहे व टिकुन आहे याचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, भारतातील अनेक धर्म,जाती-पंथ यांचा एकत्रित पणा यामुळेच आपल्याला गुरु-शिष्याचे नाते अधिक घनिष्ठ असल्याचे दिसून येते.शिष्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की ज्यांच्या पासून आपण प्रेरणा घेतो,त्याची अवहेलना कुठेही होणार नाही याची काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे. यातच शिष्यांची महानता दिसून येईल. गुरू पौर्णिमेबद्दल एक गोष्ट सांगु इच्छितो की,परिवारापेक्षा श्रेष्ठ कोणीही नाही, वडिलांपेक्षा श्रेष्ठ सल्लागार नाही,आई पेक्षा श्रेष्ठ जग नाही,भावापेक्षा श्रेष्ठ भागीदार नाही,बहीनी पेक्षा श्रेष्ठ शुभचिंतक नाही,मित्राशिवाय आयुष्य नाही यात आपल्याला गुरूचा गोडवा कीती महान आहे ते आपल्याला स्पष्ट दिसून येते.म्हणजेच प्रत्येक परीवार गुरूची भुमिका आप-आपल्या परीने पार पाडत असते.त्याचप्रमाणे सर्वांनीच एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की गुरू-शिष्याच्या नात्याला कोणीही कलंकित करणार नाही याचीही काळजी सर्वांनीच घेणे गरजेचे आहे. कारण गुरू-शिष्याच्या नात्यानेच आपण घडतो आणि घडवितो, आपला परिवार घडते व यातुनच देश घडतो.''आई माझा गुरु,आई कल्पतरू, सुखाचा सागरू,आई माझी प्रीतीचे माहेर, शांतीचे आगार, मांगल्याचे सार आई माझी''. गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने मी सर्वांना विनंती करतो की देशातील वाढते प्रदुषण,ऑक्सिजनचे कमी होत असलेले प्रमाण आणि ग्लोबल वॉर्मिंगमुळे वाढणारा धोका रोखण्यासाठी प्रत्येकांनी आपल्या परिसरात किंवा घरी वृक्षारोपण केले पाहिजे.ज्याच्या परिसरात जागा नसेल त्यांनी एखाद्या कुंडीमध्ये झाड लावुन वृक्षारोपण करायला हवे. कारण वाढते प्रदुषण मानव, जिवजंतू, वन्यप्राणी यांच्यासाठी अत्यंत धोकादायक स्थितीत आहे. त्यामुळे गुरू पोर्णिमेचे औचित्य साधून वृक्षारोपणावर भर दिला पाहिजे व पृथ्वी मातेचे रक्षण केले पाहिजे. गुरूपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
नागपूर
मो.नं.९९२१६९०७७९,

## शिक्षणाचे महत्त्व

ओळखतात जे महत्त्व शिक्षणाचे
असते त्यांना भान परिस्थितीचे
कळते ज्यांना महत्त्व शिक्षणाचे
शिक्षणासाठी करती रान जीवाचे

शिक्षण मनुष्य जीवनाचा पाया
ते मिळवण्या झिजवावी काया
वाघिणीचे दूध असते शिक्षण
आत्मसन्मानाचे ते करते रक्षण

करते शिक्षण जीवनाचा उध्दार
उच्च शिक्षितांचा होतो सत्कार
शिक्षण देते जगण्याचे शहाणपण
तेच जपते आपले माणूसपण

एका घरातला एकच शिकला
त्याने घराण्याचा उध्दार केला
शिक्षण व्यक्तीची कवचकुंडले
सद्गुणांची जणू टवटवीत फुले

आईवडील मुलांच्या शिक्षणा
अहोरात्र अपार कष्ट उपसतात
गरज पडल्यास शेती,घर आणि
स्वतःचे जीवन गहाण ठेवतात

शिक्षण वाया घालवायचे नसते
जीवनाचे सोने करायचे असते
शिक्षणाने मिळे मान सन्मान
शिक्षण वाढवी व्यक्तीची शान

शिक्षणाचे मूल्य ठरवायचे नसते
शिक्षण हेच अलौकिक असते
शिक्षण म्हणजे मौल्यवान हिरा
आनंदी जीवनाचा निर्मळ झरा

## गुरुपौर्णिमा

आषाढ पौर्णिमेला होते साजरी
वंदनीय ती गुरुपौर्णिमा
गुरुंच्या कर्तृत्ववाचा कार्याचा
शिष्यगण गाती महीमा

मनुष्य जीवनात गुरुचे स्थान
जणू त्या ध्रुव ताऱ्या सारखे
मानवी हृदयात गुरुला मान
आपल्या आई वडिलांसारखे

गुरु आमचे चारित्र्यवान
शीलवान आणि गुणवान
तंत्र वेगळे ते शिकवणीचे
हृदयात माणुसकी पेरण्याचे

लाभले आम्हाला गुरु चांगले
आमचे नशीब उजळले
गुरुंनी ज्ञान अमृताने
मुर्ती रुपात आम्हा कोरले

गुरु आमचे भांडार ज्ञानाचे
दिले शिक्षण ज्ञान अमृताचे
शब्दांच्या बाणांच्या माऱ्याने
आमचे जीवन साकारले

दीपस्तंभ गुरु आमचे
अलौकिक कार्य त्यांचे
गुरुपौर्णिमेच्या पवित्र दिनी
टेकतो माथा त्यांच्या चरणी

**बबन दामोदर गुळवे**
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर.मो.९५४५४४२६४८.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

# सद्गुरु उज्वलानंद महाराजांच्या पादुका, रथाच्या उपस्थितीत आज गोल रिंगण





**आरंभ मराठी | उमरगा**

उमरगा तालुक्यातील श्री क्षेत्र अचलबेट देवस्थान येथे तीन ठिकाणच्या रथ पालखी व हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत आज गुरुवारी (दि.१०) सायं ४:३० वाजता देवस्थानच्या पायथ्याशी गोल रिंगण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र कर्नाटक सीमेवरील श्री क्षेत्र अचलबेट देवस्थान येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी औराद शहा येथील घोडा, पादुका रथ पालखी सोहळा प्रथम आळंदी ते पंढरपूर पायी चालत पार पडला. पंढरपूर येथून औराद शहा. येथे येऊन पुढे तीन दिवस पायी रथ पालखी श्री क्षेत्र अचलबेट देवस्थान कडे रवाना झाली. मंगळवारी (दि.८) पहिल्या दिवशी निलंगा तालुक्यातील औराद ते निलंगा तब्बल २२ किमीचा प्रवास करत मानाचे दोन घोडे, पादुका, मुर्ती, पालखी, रथ थोर माकणी ते निलंगा मुक्कामी आली. तेथे हभप. भागवत महाराज पाचंगे यांची किर्तन सेवा झाली. बुधवारी (दि.९) निलंगा ते दादगी लिंबाळा मार्गे भुतमुगळी करून तब्बल २२ किमी अंतर पार करून हासोरी मुक्कामी आली. तेथे हभप. विठ्ठल महाराज दिवेगावकर यांनी किर्तन सेवा पार पडली. शेवटच्या दिवशी म्हणजे आज सकाळी हासोरी येथून कासार शिर्शी मार्गे उमरगा तालुक्यातील कुन्हाळी, त्रिकोळी, मुळज येथे दुपारी विसावा नंतर तुरोरी येथे कर्नाटक राज्यातील एकंबा गावातील पालखी एकत्र येऊन गुरू पालखी भेट होऊन देवस्थान च्या पायथ्याशी रिंगण सोहळा ठिकाणी सायं. ४:३० वा. पोहचणार आहे. कर्नाटक राज्यातील बिदर जिल्ह्यातील एकंबा गावातील सद्गुरू उज्वलानंद महाराज यांची पादुका पालखी ही आज सकाळी निघून लाडवंती, उजळंब सह महाराष्ट्र राज्यातील उमरगा तालुक्यातील मळगी, चिंचकोट, कोळसूर मार्गे तुरोरी येथे येऊन निलंगा तालुक्यातील औराद येथून येणाऱ्या पालखी सोहळ्यात सहभागी होणार आहे. तेथून एकत्र सोबत देवस्थान पायथ्याशी रिंगण सोहळ्यात सहभागी होणार आहे. कर्नाटक राज्यातील बिदर जिल्ह्यातील नवचंदवाडी येथील पादुका पालखी पायी सोहळा हा जोगेवाडी, मदारवाडी, उजळंब, एकंबा, फुलदरवाडी, होन्नाळी, हंद्राळ आर, चिट्टा, उर्की, आलगुड, वडरगा, भोसगा, वडरगा, कांबळेवाडी, मन्नाळी, चेंडकापूर, घोटाळ मार्गे उमरगा तालुक्यातील जगदळवाडी, थोरलीवाडी, धाकटीवाडी, हिप्परगा, तलमोड मार्गे राष्ट्रीय महामार्गालगत पायी प्रवास करीत श्री क्षेत्र अचलबेट देवस्थान पायथ्याशी सायं. ४:३० वा. पोहचणार आहे. देवस्थानच्या पायथ्याशी राष्ट्रीय महामार्गालगत गोल रिंगण सोहळ्यासाठी मैदान तयार करण्यात आले आहे. या ठिकाणी पालखी ठेवण्यासाठी स्टेज व स्पीकरची व्यवस्था करण्यात आली आहे. रिंगण सोहळा संपन्न होताच हभप. ज्ञानदेव गुरूजी हालसी यांचे प्रवचन नंतर सायं. ७ ते ९ या वेळी देवस्थानचे हभप. हरी गुरूजी लवटे महाराज यांचे किर्तन सेवा तसेच आषाढी वारीची सांगता होणार आहे. या सोहळ्याला दोन्ही राज्यांतील भाविक भक्तांनी उपस्थित राहून सहभाग नोंदवत घोड्यांचे गोल रिंगण व किर्तन सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन देवस्थान भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# जय मल्हार सामाजिक संस्थेकडून लांडगे यांचा रविवारी सन्मान

**शैक्षणिक कार्याबद्दल अहिल्यानगर येथे होणार गौरव**

**आरंभ मराठी | धाराशिव**



अहिल्यानगर येथील जय मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने धाराशिव येथील प्रा. सोमनाथ लांडगे यांचा रविवारी (दि.१३) राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मान होणार आहे. रविवारी सकाळी ११ वाजता लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, टिळकरोड, अहिल्यानगर येथे हा सन्मान सोहळा होणार आहे. प्रा. सोमनाथ लांडगे यांना या पुरस्कारासाठी निवड झाल्याचे पत्र संस्थेचे अध्यक्ष का. म. जाडकर यांनी पाठवले आहे. संविधानातील मुल्यांची जोपासणा जनमानसात आपल्या विविध शैक्षणिक उपक्रम व कार्याद्वारे यशस्वी करीत असल्याबद्दल तसेच अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक मदत करून यशस्वी करत असल्याबद्दल लांडगे यांचा सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून पोलीस अधीक्षक धनंजय सोलंकर, प्रमुख पाहुणे म्हणून माधव भाऊ गडदे, सरसेनापती यशवंत सेना, प्रविण कोरगंटीवार सहाय्यक आयुक्त सामाजिक न्याय विभाग, डॉ. उमेश पाटील सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, देविदास कोकाटे जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. प्रा. सोमनाथ लांडगे यांना वर्षभरात अनेक राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत. या वर्षातील राज्यपातळीवरील तिसरा पुरस्कार आहे. प्रा. सोमनाथ लांडगे यांनी आपल्या श्री साई श्रद्धा एज्युकेशनच्या सहाय्याने महाराष्ट्रातील जवळपास १६ जिल्ह्यातून आतापर्यंत २८८ मुला-मुलींना वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवून दिलेला आहे. सध्या ते धाराशिव शहरातील बिल गेट्स ज्युनिअर महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या एकूण सामाजिक व शैक्षणिक कार्याबद्दल मिळालेल्या पुरस्काराबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

# पत्रकार जगदीश कुलकर्णी, डॉ.सतीश महामुनी आणि गोविंद खुरुद यांना पुरस्कार प्रदान

**आरंभ मराठी | तुळजापूर**




तुळजापूर येथील पुजारी नगर फाउंडेशन व तुळजापूर पत्रकार संघाच्या वतीने श्रीनाथ लॉन्स येथे पत्रकार जगदीश कुलकर्णी, डॉ.सतिश महामुनी आणि गोविंद खुरुद यांना तुळजापूर श्री कृतज्ञता पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या पुरस्कार सोहळ्यात जेष्ठ पत्रकार ॲड.किशोर कुलकर्णी, अंबादास पोफळे तसेच महिपतराव कदम यांना विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. महिपतराव कदम उपस्थित नसल्याने श्रीकांत कदम यांनी पुरस्काराचा स्वीकार केला. या पुरस्कार सोहळ्यासाठी जिल्हा मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय रणदिवे, देविदास पाठक, रविंद्र केसकर यांच्यासह कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुजारी नगर फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी यांची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या शुभहस्ते श्री तुळजाभवानी देवीचे प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी सत्कारमूर्तीच्या वतीने डॉ. सतीश महामुनी यांनी सत्काराला उत्तर दिले. पत्रकार भैरवनाथ कानडे यांचा यावेळी डॉक्टरेट प्राप्त केल्याबद्धल संयोजक समितीतर्फे सत्कार करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यासाठी शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल आगलावे, सूत्रसंचालन डॉ.भैरवनाथ कानडे तर आभार सचिन ताकमोघे यांनी मानले.

सोहळा यशस्वी करण्यासाठी तुळजापूर पत्रकार संघाचे आणि पुजारी नगर फाऊंडेशनचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# गोविंदपूरचे सुपुत्र नितीन कसबे यांचा सत्कार



**आरंभ मराठी | गोविंदपूर**

कळंब तालुक्यातील गोविंदपूर येथील नितीन राजाराम कसबे याची महाराष्ट्र राज्य सुरक्षा बलमध्ये निवड झाल्याबद्दल त्याचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन भव्य नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच आशोक मस्के, उपसरपंच संतोष मुंडे, अनंत घोगरे, कबन मुंडे, लालासाहेब माळी, शंकर मुंडे, अगंद मेनकुदळे, सुभाष मेनकुदळे, माणिक मुंडे, आशोक मुंडे, संजय मुंडे, तात्याराम पाटुळे, आमोल माळी, भगवान घबाडे, मोहन माळी, वैभव माळी, दत्ता कोकाटे, संतोष पाटुळे, विश्वास केंगार, सायसराव मुंडे, पदमाकर जाधव, सुग्रीव मुंडे, राजाराम कसबे, अक्षय मुंडे, धनंजय मुंडे, धनंजय माळी, साहेबराव मुंडे, रघुनाथा मुंडे, अनिल मुंडे,व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कल्याणसागर बँकेच्या चेअरमनपदी डॉ. मंदार पंडित तर व्हा. चेअरमनपदी राजेंद्र चौधरी

## नवनिर्वाचित संचालकांचा सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते सत्कार

**आरंभ मराठी | परंडा**



परंडा येथील कल्याणसागर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या चेअरमनपदी डॉ. मंदार वसंतराव पंडित तर व्हाईस चेअरमनपदी राजेंद्र मोहन चौधरी यांची निवडणूक निर्णय अधिकारी बी. एच. सावतर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत अविरोध निवड करण्यात आली. कल्याणसागर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या नवनिर्वाचित संचालकांच्या बुधवारी (दि.९) झालेल्या बैठकीत ही निवड झाली. या निवडी नंतर कल्याणसागर समुहाचे व बँकेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी नवनिर्वाचित चेअरमन डॉ. पंडित मंदार वसंतराव, व्हाईस चेअरमन चौधरी राजेंद्र मोहन आणि संचालक विटकर हनुमंत नागनाथ, काकडे चंद्रकांत नानासाहेब, कळंबकर नुरूद्दीन गुलाम मोहियोद्दीन, काशिद महावीर दिगंबर, देवकर श्रीराम सखाराम, डोंगरे अशपाक अब्दुल सत्तार, शिंदे अप्पासाहेब बापूसाहेब, शहा किरण भागचंद, ॲड. भालचंद्र विठ्ठलराव औसरे, श्रीमती मिस्कीन सरस्वती मनोहर व श्रीमती कुलकर्णी प्रज्ञा रामचंद्र यासर्वांचा फेटा बांधून पुष्पहाराने सत्कार केला. यावेळी कल्याणसागर बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोजसिंह ठाकूर व बँकेचे कर्मचारी उपस्थित होते.

# शेलगाव (दि.) येथील विवेक सुरवसे यांची एनपीसीआयएलमध्ये शास्त्रज्ञ म्हणून निवड

**आरंभ मराठी | येरमाळा**

कळंब तालुक्यातील शेलगाव (दि.) येथे प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत असणारे ज्ञानेश्वर गोपीनाथ सुरवसे यांचा मुलगा विवेक यांची भारत सरकारच्या न्यूक्लियर पावर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड या ठिकाणी शास्त्रज्ञ म्हणून निवड झाली असून त्यांचे नियुक्ती पत्र त्यांना नुकतेच प्राप्त झाले. त्यांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. विवेकचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत झाले आहे. तर माध्यमिक शिक्षण जनता विद्यालय मुरुड येथे झाले आहे. सुरुवातीपासूनच अभ्यासात कायम अग्रस्थानी असणाऱ्या विवेकने दहावीत शंभर टक्के गुण घेऊन आपली भविष्यातील दिशा दाखवून दिली होती. तेव्हापासूनच शास्त्रज्ञ होण्याचे त्यांचे स्वप्न होते. लातूर येथील नामांकित राजर्षी शाहू महाविद्यालयातून आयआयटी जेईई तयारी करून भारतातील अव्वल असणाऱ्या आयआयटी मद्रास (चेन्नई)



तामिळनाडू येथून . . (इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग) प्रथम श्रेणीत पुर्ण केले. परीक्षा २०२५ यशस्वी होवून या द्वारे वैज्ञानिक क्षेत्रात पदार्पण केले. विवेकने लहाणपणापासून बाळगलेले स्वप्न साकार होत असताना या प्रवासात वडिलांबरोबर आईचे कष्ट अधिक मोलाचे ठरले आहे. त्यामुळे विवेकचे वडील विवेकच्या यशाचे श्रेय त्याच्या आईला व मार्गदर्शक सर्व शिक्षक यांना देतात. विवेकच्या या यशाबद्दल सर्व संबंधित शिक्षक, तसेच नेहमी मार्गदर्शन करणारे धर्मराज काळमाते, गटशिक्षणाधिकारी कळंब, विविध अधिकारी आणि सर्व स्तरातून कौतुक होत आहे. सामान्य शिक्षकाच्या मुलाने मिळवलेले यश आदर्शवत असून त्याबद्दल विवेक बरोबर त्याच्या आई वडिलाचे देखिल सर्वत्र अभिनंदन आणि कौतुक होत आहे.

# केसरजवळगा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत संगणक कक्षाचे उद्घाटन

**आरंभ मराठी | मुरूम**



उमरगा तालुक्यातील केसरजवळगा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत नवीन संगणक कक्षाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात पार पडले. या उद्घाटन सोहळ्याचे प्रमुख पाहुणे शाळा व्यवस्थापन समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष संदीप पाटील, उपाध्यक्ष अजीज शेख, तसेच मुख्याध्यापक श्रीकांत जवळेकर होते. बुधवारी (ता. ९ जुलै) रोजी हा कार्यक्रम संपन्न झाला. शाळेला जिल्हा परिषदेमार्फत ७ संगणक प्राप्त झाले असून, नव्या संगणक कक्षात सर्व आवश्यक सुविधा पुरवण्यात आल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या नव्या वाटा शिकण्यासाठी मोठी संधी उपलब्ध झाली आहे. यावेळी अध्यक्ष संदीप पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, ''सध्याचे युग संगणक व तंत्रज्ञानाचे आहे. त्यामुळे नवीन पिढीसाठी संगणक साक्षर असणे ही काळाची गरज आहे. प्राथमिक स्तरावरच संगणकाचे शिक्षण मिळणे ही विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त बाब आहे.'' उपाध्यक्ष अजीज शेख यांनीही आपल्या भाषणात, ''गावाची शाळा बदलत असल्याचे पाहून आनंद होत आहे. शाळेसाठी जे-जे आवश्यक असेल, ते सर्व सहकार्य करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत,'' असे आश्वासन दिले. माजी सरपंच व विद्यमान सदस्य अमोल पटवारी यांनी शाळेला क्रीडा साहित्य देण्याचे आश्वासन दिले असून, यासाठी शाळेकडून यादी मागवून तात्काळ साहित्य पुरवण्याची ग्वाही त्यांनी दिली. कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य बालाजी डिगोळे, जयपालसिंग राजपूत, गैबूशा मकानदार, पालक व सर्व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी भोसले, तर आभार उपाध्यक्ष अजीज शेख यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रमात विद्यार्थ्यांमध्ये नवीन शिकण्याचा उत्साह, पालकांमध्ये समाधान आणि ग्रामस्थांमध्ये अभिमानाचे वातावरण दिसून आले.

# व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाची बिनविरोध निवड

**पारदर्शक कारभार व सभासदांच्या एकतेचा विजय;श्रीकांत मिणियार यांनी मांडले मनोगत**

**आरंभ मराठी | मुरूम**



मुरुम शहर व परिसरात विश्वासार्हतेचा लौकिक कमावलेल्या व्यापारी नागरी सहकारी म. पतसंस्थेच्या संचालक मंडळाची बिनविरोध निवड मोठ्या उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात मंगळवारी (ता. ८ जुलै) रोजी पार पडली. १९९५ पासून सुरू असलेल्या बिनविरोध निवडीच्या परंपरेला यंदाही कायम ठेवत संस्थेच्या सभासदांनी एकतेचा परिचय दिला. यावेळी अध्यक्षपदी उमेश कारभारी, उपाध्यक्षपदी अशोक चव्हाण, तर सचिवपदी श्रीकांत मिणियार यांची निवड करण्यात आली. तसेच संचालक मंडळात शशिकांत बाबशेट्टी, अंबाजी बिराजदार, सुरेश रणसुरे, प्रवीण सोलापुरे, दत्तात्रय गिरीबा, महानंदा ख्याडे, प्रेमा झंवर यांची संचालक म्हणून निवड करण्यात आली. नवनिर्वाचित संचालकांचे व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेच्या सर्व सभासदांनी तसेच मुरुम शहर व परिसरातील नागरिकांनी हार्दिक अभिनंदन केले. कार्यक्रमात सचिव श्रीकांत मिणियार यांनी आपल्या मनोगतात म्हटले, ''व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेचा मुख्य उद्देश म्हणजे सभासदांसह व्यापाऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे, तसेच त्यांच्यावर विश्वासाचे व पारदर्शकतेचे बळ देणे. भविष्यात संस्थेच्या माध्यमातून अधिकाधिक कर्ज सुविधा, आर्थिक सल्ला व मार्गदर्शन देण्याचे उद्दिष्ट आहे. व्यापाऱ्यांना विविध सुविधा अधिक सुलभ स्वरूपात देण्यावर संचालक मंडळ कटिबद्ध आहे. सभासदांनी दाखवलेल्या विश्वासाचे आम्ही नेहमी ऋणी आहोत आणि हा विश्वास पाठीशी घेऊन संस्था अधिक प्रगतीपथावर नेण्यासाठी प्रयत्नशील राहू.'' यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून व्ही. एम. कातपुरे यांनी पारदर्शकपणे जबाबदारी सांभाळली. कार्यक्रमासाठी सिद्रामप्पा तूगावे, सिद्धू स्वामी, राजकुमार स्वामी, मनोज व्हसाकले, मेघराज धुमरे, संजय टिकांबरे, आर व्ही स्वामी आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिद्धू स्वामी यांनी केले. सूत्रसंचालन राजकुमार स्वामी तर आभार मेघराज धुमुरे यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रमात सभासद, पदाधिकारी व उपस्थित मान्यवरांमध्ये एकता व उत्साह दिसून आला, तसेच पतसंस्थेच्या पुढील वाटचालीसाठी सकारात्मक ऊर्जा मिळाली.

# जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सहावी प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

## २९ जुलै पर्यंत करता येणार अर्ज

**आरंभ मराठी | तुळजापूर**

तुळजापूर येथील पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयातील इयत्ता सहावी साठी ऑनलाइन प्रवेश अर्ज भरणे सुरू झाले असून याची अंतिम मुदत २९ जुलै असणार आहे. हे अर्ज निशुल्क भरण्यात येणार आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता इयत्ता सहावी वर्गाचे प्रवेश अर्ज भरण्यास सुरुवात झाली असून, भारत सरकारने मुला मुलींसाठी मोफत शिक्षण देण्यासाठी देशातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये जवाहर नवोदय विद्यालयाची स्थापना केली आहे. यासाठी सहावी मध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांची निवड चाचणी परीक्षा १३ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात येणार आहे. यासाठीचे ऑनलाइन अर्ज जवाहर नवोदय विद्यालयाच्या संकेतस्थळावर भरता येणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ मध्ये इयत्ता पाचवीमध्ये धाराशिव जिल्ह्यातील मान्यता प्राप्त शाळेत शिक्षण घेत असणारे विद्यार्थी ज्यांची जन्मदिनांक १ मे २०१४ ते ३१ जुलै २०१५ च्या दरम्यान असणारे व धाराशिव जिल्ह्यातील रहिवासी असणारे विद्यार्थीच प्रवेश अर्ज भरण्यास पात्र असणार आहेत. याबाबत अधिक माहितीसाठी विद्यालयाचे प्राचार्य के वाय इंगळे यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच सहाय्यतेसाठी ए एस मने व एस आर गज्ञम यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन जवाहर नवोदय विद्यालयाकडून अधिकृत पत्राद्वारे करण्यात आले आहे. संपर्कासाठी मोबाईल नं. क्र. ९७६६९०८७३३ व ९९२१७३०३५७ यावर संपर्क साधण्याचे आवाहन जवाहर नवोदय विद्यालय कडून करण्यात आले आहे.

# आमदार डॉ.तानाजी सावंत यांची ३ तालुक्यांना सात महिन्यांपासून प्रतीक्षा

## निवडणुकीनंतर मतदारसंघात एकदाही न फिरकल्याने नागरिकांचे प्रश्न कायम

अर्जुन गोडगे | आरंभ मराठी

**परंडा – विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परंडा येथे प्रचार सभेमध्ये माजी मंत्री तानाजी सावंत यांना निवडून द्या. मी त्यांना नामदार करतो असा शब्द दिला होता. पण राजकीय परिस्थितीचा विचार करून तानाजी सावंत यांचा मंत्री पदाच्या यादीतून पत्ता कट झाला. निसट्या विजयाचा गुलाल लावून तानाजी सावंत मुंबईकडे गेले. मात्र, परंडा मतदारसंघाकडे एकदाही फिरकलेच नाहीत. माजी मंत्री तानाजी सावंत यांच्या मनात नेमकं आहे तरी काय? असा प्रश्न मात्र मतदारसंघातील जनतेला पडला आहे.**



वधानसभा निवडणुकीला सात महिने होऊन गेले. मात्र भूम, परंडा, वाशी मतदारसंघाचे आमदार माजी मंत्री डॉ. तानाजीराव सावंत एकदाही म तदारसंघात फिरकले नाहीत. त्यामुळे मतदारसंघातील नागरिकांचे प्रश्न कायम आहेत तर कार्यकर्ते संभ्रमात आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दोन महिन्यांवर आल्या असताना सेनापतीच मैदानात नाहीत तर सैनिक लढणार कसे? असा प्रश्न कार्यकर्त्यांना पडला आहे. भूम खरेदी विक्री संघाची निवडणूक बिनविरोध झाल्यानंतर माजी आमदार राहुल मोटे यांनी तानाजी सावंत यांना त्यांच्या उद्योगधंद्यासाठी संरक्षण हवं म्हणून आमदारकी हवी होती. पुण्यात बसून ते त्यांचे उद्योग सांभाळत आहेत. त्याम ुळे मतदारसंघात ते फिरकले नाहीत. तानाजी सावंत यांना जनतेने जनादेश दिलेला असताना जनतेला वाऱ्यावर सोडलं आहे. जनतेच्या प्रश्नाकडे लक्ष द्यायला वेळ नसेल तर त्यांनी राजीनामा द्यावा अशी टीका केली. पक्ष, मेळावे, पावसाळी अधिवेशन अशा सर्वच कार्यक्रमांकडे तानाजी सावंत यांनी पाठ फिरवली आहे. सध्या पुतणे धनंजय सावंत हेच आम दार तानाजी सावंत यांचे काम पाहत आहेत. तानाजी सावंत यांना निसटता का होईना मतदारसंघातील जनतेने गुलाल लावला. तानाजी सावंत यांच्या रूपाने भूम, परंडा, वाशीत शैक्षणिक क्रांती, एमआयडीसी, रोजगार निर्मिती यासारखे प्रश्न सुटतील अशी अपेक्षा नागरिकांना होती.

### निागरिक हतबल तर कार्यकर्ते संभ्रमात

मतदारसंघातील नागरिकांचे हजारो प्रश्न असताना लोकप्रतिनिधी नसल्यामुळे आपले प्रश्न मांडावे कोणासमोर असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. पुतणे धनंजय सावंत यांच्यामार्फत जनतेची कामे केली जात असली तरी त्यालाही मर्यादा आहेत. त्यातच कार्यकर्ते सैरभर झाले आहेत. भूम खरेदी विक्री संघाची निवडणूक बाय दिल्याप्रमाणे एकतर्फी झाली. आता जिल्हा परिषद, नगरपालिका आणि पंचायत समितीच्या निवडणुकीची तयारी करण्यासाठी तरी सावंत मतदारसंघात येतील अशी अपेक्षा कार्यकर्त्यांना आहे. तोपर्यंत कार्यकर्ते सावंत यांच्या दौऱ्याकडे डोळे लावून बसले आहेत.

परंतु, विजयाचा गुलाल लावून गेल्यापासून तानाजी सावंत हे मतदारसंघात एकदाही फिरकले नाहीत. तानाजी सावंत यांच्या मनात नेमकं चाललंय तरी काय असा प्रश्न मात्र सर्वसामान्य जनतेला पडत आहे.

# चार कोटी मराठे मुंबईत नेण्यासाठी गावोगावी जाऊन नियोजन करा

## कारी येथील चावडी बैठकीतून जरांगे पाटलांचे आवाहन

आरंभ मराठी | धाराशिव

मराठा समाजाला सरकारने मुंबईत येण्याची वेळ येऊ देऊ नये अन्यथा चार कोटी पेक्षा जास्त मराठे मुंबईत धडकणार आहेत. त्यासाठी गावोगावी जाऊन मराठा बांधवांशी संवाद साधून नियोजन करा असे आवाहन मराठा आरक्षणाचे आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी धाराशिव तालुक्यातील कारी येथे केले. कारी या गावी जरांगे पाटील यांनी बुधवारी (दि.९) चावडी बैठक घेऊन आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी मराठा बांधवांशी संवाद साधला. धाराशिव येथील व्हॅलिडीटी ऑफिसमध्ये कुणबी मराठा व एसईबीसी जात वैधता प्रमाणपत्रासाठी अधिकारी खोडसाळपणा करून समाजाला व्हॅलिडीटी पासून वंचित ठेवत असल्याचा आरोप यावेळी मराठा बांधवांनी जरांगे पाटील यांच्यासमोर केला. यावेळी जरांगे पाटील यांनी धाराशिव जिल्हा प्रशासनाने मराठ्यांवर अन्याय होणार नाही याची काळजी घेण्याचे आवाहन केले. गरज पडली तर व्हॅलिडीटी ऑफिसमध्ये अधिकाऱ्यांना घेराव घालण्यात येईल असा इशारा त्यांनी दिला. यावेळी मुंबई येथील नियोजित आंदोलनाचे नियोजन करण्यात आले. या बैठकीला जिल्ह्यातील हजारो मराठा आंदोलकांनी उपस्थिती लावली होती.



# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तयारीसाठी शिवसेनेची शहर बैठक




आरंभ मराठी | धाराशिव

आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या शहर विभागाची महत्वपूर्ण बैठक शहरातील शासकीय विश्रामगृहात बुधवारी घेण्यात आली. या बैठकीत आगामी काळात पक्ष संघटन वाढीसाठी नियोजनात्मक चर्चा करण्यात आली.उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्यनेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व पालकमंत्री तथा महाराष्ट्र परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या आदेशानुसार ही बैठक घेण्यात आली.यावेळी शिवसेना पक्षवाढीबाबत सखोल मार्गदर्शन व चर्चा करण्यात आली.शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी बहुमोल केले तसेच डी एन. कोळी, शिवसेना शहरप्रमुख आकाश कोकाटे,यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी महिला आघाडी जिल्हा संघटक किरणताई निंबाळकर, महिला तालुकाप्रमुख मायाताई चव्हाण, महिला शहरप्रमुख कल्पनाताई माळी, कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष अरुण डोलारे, शिवउद्योग सेनेचे जिल्हाध्यक्ष सुनील शेरखाने, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष शमशोद्दीन शेख, व्हीजेएनटी जिल्हाध्यक्ष कमलाकर दाणे, शिवसेना उपशहर प्रमुख रजनीकांत माळाळे, उपतालुकाप्रमुख रामेश्वर मगर, जयंत राजे भोसले, भीमा जाधव, अभिजीत देडे,अमर माळी, ज्ञानेश्वर ठवरे, राजेश मळाळे, रवी झेंडे, बालाजी झेंडे, ओबीसी शहराध्यक्ष यश हंचाटे, युवासेना जिल्हा संघटक आकाश कावळे, अजय नाईकवाडी, उद्धव तात्या अवचार, धनाजी साळुंके, लखन झिरमिरे, अजिंक्य आगलावे, विशाल गाढवे, अनिकेत डोंगरे आदींसह शिवसैनिक उपस्थित होते. बैठकीचे आयोजन शिवसेना शहरप्रमुख आकाश कोकाटे यांनी केले होते.

# रोटरी क्लबचे नूतन अध्यक्ष संतोष लोखंडे यांचा सत्कार

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर शहरातील व्यापारी संतोष लोखंडे यांची रोटरी क्लब तुळजापूर शाखेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल मोदी ३.० हे पुस्तक भेट देऊन भारतीय जनता पार्टीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष संदीप गंगणे, शहर सरचिटणीस धैर्यशील दरेकर, युवा मोर्चा शहराध्यक्ष राम चोपदार, इंद्रजीत साळुंखे, समर्थ पैलवान, राजरत्न कदम उपस्थित होते.

# कत्तलीखान्यात नेण्यात येणाऱ्या पाच गाईंची सुटका

आरंभ मराठी | वाशी

बेकायदेशीर गोवंशीय जनावरांची वाहतूक करणाऱ्या व्यक्तीवर वाशी पोलिसांनी कारवाई करून पाच गाईंची सुटका केली. यातील आरोपी किरण तायाप्पा शिंदे (वय ३८ वर्षे, रा. परंडा) हा दिनांक ८ जुलै रोजी इंदापुर शिवारातील भैरवनाथ साखर कारखान्या समोर हायवे रोडवर पिकअप (क्र एमएच १३ डिक्यु०७०६) मध्ये गोवंशीय जातीच्या ३ जर्सी गायी १ खिल्लार जातीची गाय व १ गिर गाय असे एकुण वाहनासह ३,५०,००० रुपये किंमतीची गोवंशीय जनावरे त्यांच्या चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करताना वाशी पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे त्याच्याविरुध्द कलम ५(अ), ५(ब), ९(ब),११ प्राणी संरक्षण अधिनियम सह प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१), ११(१) (अ), ११(१) (एफ) ११(१) (एच),११(१)(आय) सह प्राण्यास परिवाहन अधिनियम कलम ४७, ५४, ५६अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# सोनारी येथील जिल्हा परिषद शाळेला पालकांनी ठोकले टाळे





आरंभ मराठी | परंडा

परंडा तालुक्यातील सोनारी येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षकाची व शिपायाची नेमणुक करावी अशी मागणी मागील एक व दोन वर्षापासून पालक विद्यार्थी ययांच्याकडून सतत केली जात आहे. ही मागणी लेखी व तोंडी जिल्हा परिषदेच्या वरिष्ट अधिकारी यांच्याकडे करुन देखील त्यांनी या मागणीकडे दुर्लक्ष केल्यामुळे बुधवारी (दि.९) ग्रामस्थांनी व पालकांनी शाळेला टाळे टोकुन शाळा बंद केली. पात्रता धारक शिक्षक नसल्यामुळे या शाळेत शिकणाऱ्या ९ वी व १० वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. या सर्व गोष्टींना जिल्हा परिषदेचे अधिकारी जबाबदार आहेत असा आरोप यावेळी पालकांनी केला. तसेच या शाळेत शिपाई नसल्यामुळे संपूर्ण शाळेची स्वच्छता करण्याची वेळ विद्यार्थ्यांवर आली आहे. त्याच बरोबर तालुक्यातील बऱ्याच शाळेत शिक्षकाची पदे रिक्त आहेत. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्वरित लक्ष देवुन विध्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळावे अशी मागणी पालक वर्गातून होत आहे.

# जवळा (नि.) शिवारात आंतरमशागतीच्या कामांना वेग

आरंभ मराठी | जवळा



परंडा तालुक्यातील जवळा (नि.) परिसरात खरीप हंगामातील पिकांची वाढ जोमात होत असून, सध्या शिवारात पिकांच्या आंतरमशागतींच्या कामाला बळीराजाने सुरुवात केल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे. परंडा तालुक्यातील जवळा परिसरात समाधानकारक पाऊस झाल्यामुळे यावर्षी वेळेवर पेरणी झाली. जवळा परिसरात शेतकऱ्याकडून बैल जोडीने कोळपणीला सुरुवात केली आहे. जवळा परिसरात तूर ,मूग ,उडीद, सोयाबीन ,मका या पिकांची पेरणी झाली असून, ही पिके जोमात आली आहेत. शेतकरी आपली कामे बैल जोडीच्या साह्याने करत आहेत. सध्या बळीराजा कोळपणीच्या कामात व्यस्त असल्याचे दिसून येते. पिकांची वाढ सध्या जोमात असून बळीराजाला आता चांगल्या पावसाची प्रतीक्षा आहे.

# भूम येथे ज्योतिष प्रबोध परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

आरंभ मराठी | भूम

ज्योतीशशास्त्राचे विद्यार्थी घडवताना जे शिक्षक शास्त्र शिकवतात त्यांच्याकडे चांगले कौशल्य असणे आवश्यक असल्याचे मत पंचांगकर्ते मोहन धुंडीराज दाते यांनी सांगितले. ते बुधवारी (दि.९) भूम येथील श्री वागीश वेद विज्ञान संस्था यांच्या वतीने कसबा येथील श्रीराम मंदीरात ज्योतिष प्रबोध या परिक्षेत उत्तिर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ कार्यक्रमात बोलत होते. यावेळी त्यांनी ज्योतीशशास्त्रात यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी पुणे येथील खगोलशास्त्रज्ञ मधुसूदन




बेलसरे, वेदमुर्ती कृष्णा गुरुजी पाञुडकर हे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ज्योतिष प्रबोध या अभ्यासक्रमात यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी ब्राम्हण जिल्हा महासंघाचे विलास शाळु श्रीपाद देशमुख, जनसेवा बँकेचे चेअरमन श्रीराम मुळे, राजाभाऊ धर्माधिकारी, सचिन बारगजे यांच्यासह शहरातील प्रतिष्ठित नागरिक महिला परिसरातील नागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अर्पुवा गांधी यांनी केले तर प्रास्ताविक अमृता वैद्य यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वेदमुर्ती सचिन वैद्य व त्यांचे सहकारी यांनी परिश्रम घेतले.

# वाढीव टप्पा अनुदान मागण्यासाठी दुसऱ्या दिवशीही शाळांना टाळे

## विद्यार्थ्यांना आल्या पावली परतावे लागले

आरंभ मराठी | धाराशिव

विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांना वाढीव टप्पा अनुदान मिळावे या व इतर मागण्यासाठी शिक्षक समन्वय संघाच्या वतीने पुकारलेल्या बंदला धाराशिव जिल्ह्यात दुसऱ्या दिवशीही प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा सलग दुसऱ्या दिवशी बंद ठेवण्यात आल्या होत्या. यावेळी शाळा सुरू होईल या अपेक्षेने आलेल्या विद्यार्थ्यांना आल्या पावली घराकडे परतावे लागले. धाराशिव जिल्ह्यात अंशतः अनुदानित माध्यमिक ४२ व उच्च माध्यमिक ५१ तर इतर प्राथमिक शाळा आहेत. त्या शाळांना वाढीव २० टक्के टप्पा अनुदान मिळावे म्हणून जिल्ह्यातील विविध संघटनांनी पाठिंबा दिला होता. अंशतः अनुदान मागण्याबरोबरच इतर मागण्याही यावेळी संघटनांनी केल्या होत्या. यामध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना मिळावी, सर्व शाळांना १००% अनुदान मिळावे, १५ मार्च २०२४ चा संच मान्यतेचा जाचक शासन अध्यादेश त्वरित रद्द करावा, अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे तात्काळ समायोजन करावे, शाळांना वेतनेत्तर अनुदान लवकर द्यावे, पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी भरती रद्द करावी आदी मागण्यासाठी सलग दुसऱ्या दिवशी शाळा बंद करण्यात आला होत्या. जर मागण्या मान्य झाल्या नाहीत तर आगामी काळात बेमुदत शाळा बंद आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिक्षक समन्वय संघाने दिला आहे. या आंदोलनात संस्थाचालक संघटना, धाराशिव जिल्हा मुख्याध्यापक



संघ, महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी शिक्षक संघ, मराठवाडा शिक्षक संघ, महाराष्ट्र शिक्षक परिषद, मागासवर्गीय शिक्षक संघटना, शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना व इतर शिक्षण क्षेत्रातील संघटनांनी सहभाग घेतला होता. आंदोलनात संस्थाचालक संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुधीर पाटील, सचिव लहू लोमटे, धनंजय शिंगाडे, लिंबराज टिकले, पांडुरंग लाटे, मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेश टेकाळे, सचिव अनंत सूर्यवंशी, सहसचिव राजेंद्र मडके, महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी शिक्षक संघाचे राज्य उपाध्यक्ष बालाजी तांबे, जिल्हाध्यक्ष बालाजी इतबारे, जिल्हा सरचिटणीस राजकुमार मेंढेकर, उपाध्यक्ष संभाजी गायकवाड, शहराध्यक्ष प्रा.राहुल पाटील, मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष जयपाल शेरखाने, कार्याध्यक्ष डी. के. भोसले, तालुका अध्यक्ष सुधीर दराडे, शहराध्यक्ष व्यंकट पाटील, महाराष्ट्र शिक्षक परिषदेचे मराठवाडा उपाध्यक्ष उम ाकांत कुलकर्णी, मागासवर्गीय शिक्षक संघटनेच्या जिल्हाध्यक्षा अनिता पाटील, शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष खैरूद्दीन सय्यद, जिल्हाध्यक्ष विश्वनाथ दहिफळे आदी पदाधिकाऱ्यासह अनेकांनी शाळा बंदचे नेतृत्व केले.

# शिक्षकाने फुलवलेल्या ड्रॅगन फ्रुट बागेतील पहिले फळ विद्यार्थ्यांना

## शिक्षकाचा स्तुत्य उपक्रम ; २०० विद्यार्थ्यांना फळांचे वाटप



आरंभ मराठी | मुरुड

मुरुड येथून जवळ असलेल्या बोरगाव काळे येथील रहिवासी व माटेफळ जिल्हा परिषद शाळेत कार्यरत असणारे शिक्षक गंगाधर दत्तात्रय देशमुख यांनी नोकरी करत उर्वरित वेळेत व सुट्टीमध्ये आपला पारंपरिक व्यवसाय शेतीकडे लक्ष केंद्रित करून एक एकर ड्रॅगन फळांची बाग फुलवली. या बागेतून दुसऱ्यांदा उत्पन्न सुरू झाल्याने त्यांनी दहा कॅरेट ड्रॅगन फ्रुट आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना वाटप केले. विशेष म्हणजे या बागेतील पहिल्याच ड्रॅगन फळाची गोड चव विद्यार्थ्यांना देवून शिक्षकी पेशातील सामाजिक बांधिलकी जपली. विद्यार्थ्यांना केवळ शाळेतील शिक्षणापुरतेच मर्यादडीत न ठेवता, शेतातील निघालेले पहिले ड्रॅगन फळ विक्री न करता आपल्या स्वतःच्या विद्यार्थ्यांना देण्यासाठी नेहमी आग्रही असतात. यानिमित्ताने त्यांनी बोरगाव काळे येथील जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडीलाही २०० विद्यार्थ्यांना फळांचे वाटप केले. नोकरी करताना वेळ मिळेल तसे शेतीकडे लक्ष देत, नवनवीन पिके घेऊन प्रयोग करणे, विद्यार्थ्यांमध्ये कृषीविषयक माहिती देणे देवून आत्मनिर्भरतेचा मार्ग दाखवणे अशी त्यांची शिकवण असते. त्यांच्या या उपक्रमामुळे केवळ शाळेतील विद्यार्थीच नव्हे, तर परिसरातील शेतकरी आणि पालक वर्गालाही नवी प्रेरणा मिळत आहे. नोकरी आणि शेती यांचा सुंदर समन्वय साधत त्यांनी दाखवून दिले की, इच्छाशक्ती असेल तर वेळेचा योग्य वापर करून कोणताही स्वप्न यशस्वी करता येते. ड्रॅगन फळ वाटप प्रसंगी मुख्यद्यापक सूर्यकांत काळे, माजी चेअरमन दीपक काळे, शालेय समिती अध्यक्ष खंडू ऑटे,पत्रकार बाबासाहेब काळे, पालक, शिक्षक व कर्मचारी यांची उपस्थिती होती.